03 JAN 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवनिर्मितीक्षम पिढीची गरज

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; विद्यापीठात महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटर प्रोग्राम

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

नवनिर्मितीक्षम व अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महाराष्ट्र शासन उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग सभागृहात शासनाच्या महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्रामअंतर्गत एकदिवसीय महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच उपक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, भारतीय शिक्षण प्रणाली ही अध्ययन - अध्यापन प्रक्रियेमध्ये अधिक जखडलेली आहे. त्या तुलनेत परदेशी विद्यापीठांत संशोधन आणि विकास यांच्या




**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटर प्रोग्राम'च्या उद्घाटन समारंभात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील. व्यासपीठावर डावीकडून राजकुमार सिंग, अशोक जॉन, अजयकुमार पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शिवलिंगप्पा सपली.**

जोडीला कन्सल्टन्सीही फार महत्त्वाची भूमिका बजावते. कॉर्नेल विद्यापीठाच्या सहकार्याने हाती घेण्यात आलेला महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम फार महत्त्वाचा आहे. त्यामध्ये युवावर्गाने स्पर्धात्मक पद्धतीने सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावेत.

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्टअप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

जिल्हा उद्योग केंद्राचे

- **कॉर्नेल युनिव्हर्सिटी न्यूयॉर्कचा पुढाकार**
- **शिवाजी विद्यापीठही सहयोगी**

महासंचालक अजयकुमार पाटील यांनी महा-६० एक्सिलरेशन प्रोग्रामविषयी माहिती दिली.

यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, एक्स. ई. डी. कंपनीचे संचालक अशोक जॉन, सिडबीचे सहायक महाव्यवस्थापक राजकुमार सिंग उपस्थित होते. उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन यांच्यासह आर. एन. टी. रोबोटिक्सचे विश्वजित खाडे, प्रतीक पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे उपसंचालक अनमोल कोरे यांनी मार्गदर्शन केले.

03 JAN 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवनिर्मितीक्षम पिढीची गरज

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; विद्यापीठात महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटर प्रोग्राम

- कॉर्नेल युनिव्हर्सिटी न्यूयॉर्कचा पुढाकार
- शिवाजी विद्यापीठही सहयोगी

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

नवनिर्मितीक्षम व अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महाराष्ट्र शासन उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग सभागृहात शासनाच्या महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्रामअंतर्गत एकदिवसीय महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच उपक्रमाच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, भारतीय शिक्षण प्रणाली ही अध्ययन - अध्यापन प्रक्रियेमध्ये अधिक जखडलेली आहे. त्या तुलनेत परदेशी विद्यापीठांत संशोधन आणि विकास यांच्या जोडीला कन्सल्टन्सीही फार महत्त्वाची भूमिका बजावते. कॉर्नेल विद्यापीठाच्या सहकार्याने हाती घेण्यात आलेला महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम फार महत्त्वाचा आहे. त्यामध्ये युवावर्गाने स्पर्धात्मक पद्धतीने सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावेत.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटर प्रोग्राम'च्या उद्‌घाटन समारंभात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील. व्यासपीठावर डावीकडून राजकुमार सिंग, अशोक जॉन, अजयकुमार पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शिवलिंगप्पा सपली.**

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्टअप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक अजयकुमार पाटील यांनी महा-६० एक्सिलरेशन प्रोग्रामविषयी माहिती दिली.

यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, एक्स. ई. डी. कंपनीचे संचालक अशोक जॉन, सिडबीचे सहायक महाव्यवस्थापक राजकुमार सिंग उपस्थित होते. उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन यांच्यासह आर. एन. टी. रोबोटिक्सचे विश्वजित खाडे, प्रतीक पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे उपसंचालक अनमोल कोरे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 JAN 2024

पुण्यनगरी

# नवनिर्मितीक्षम युवा पिढीची देशाला गरज

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, 'महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटरला प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवनिर्मितीक्षम आणि अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शासनाचा उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम' अंतर्गत एकदिवसीय कार्यक्रमात ते अध्यक्षपदावरुन बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, कॉर्नेल विद्यापीठ हे जागतिक अग्रमानांकित ५० विद्यापीठांपैकी एक आहे. त्यासमवेत सामंजस्य करार करून शासनाने युवा वर्गासाठी कौशल्य विकासाची आणि स्टार्टअप संकल्पना फुलविण्याची संधी उपलब्ध केली आहे. या संधीचा विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी पुढे यायला हवे. कार्यशाळेतील सर्व मार्गदर्शकांचा उपस्थितांनी मनापासून लाभ घ्यावा.

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्टअप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक अजयकुमार पाटील यांनी 'महा-६० एक्सिलरेशन प्रोग्राम' विषयी उपस्थितांना अवगत केले. यावेळी मंचावर तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, एक्स.ई.डी. कंपनीचे संचालक अशोक जॉन, सिडबीचे सहाय्यक महाव्यवस्थापक राजकुमार सिंग उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन यांच्यासह आर एन टी रोबोटिक्सचे विश्वजीत खाडे, प्रतीक पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे उपसंचालक अनमोल कोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह स्टार्टअपविषयी जिज्ञासू नागरिकांचा, इच्छुक व्यावसायिकांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

03 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवनिर्मितीक्षम युवा पिढीची देशाला गरज

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, 'महा-६० कॉर्नेल ॲक्सिलरेटरला प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवनिर्मितीक्षम आणि अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शासनाचा उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम' अंतर्गत एकदिवसीय कार्यक्रमात ते अध्यक्षपदावरुन बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, कॉर्नेल विद्यापीठ हे जागतिक अग्रमानांकित ५० विद्यापीठांपैकी एक आहे. त्यासमवेत सामंजस्य करार करून शासनाने युवा वर्गासाठी कौशल्य विकासाची आणि स्टार्टअप संकल्पना फुलविण्याची संधी उपलब्ध केली आहे. या संधीचा विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी पुढे यायला हवे. कार्यशाळेतील सर्व मार्गदर्शकांचा उपस्थितांनी मनापासून लाभ घ्यावा.

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्टअप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक अजयकुमार पाटील यांनी 'महा-६० एक्सिलरेशन प्रोग्राम' विषयी उपस्थितांना अवगत केले. यावेळी मंचावर तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, एक्स.ई.डी. कंपनीचे संचालक अशोक जॉन, सिडबीचे सहाय्यक महाव्यवस्थापक राजकुमार सिंग उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन यांच्यासह आर एन टी रोबोटिक्सचे विश्वजीत खाडे, प्रतीक पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे उपसंचालक अनमोल कोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह स्टार्टअपविषयी जिज्ञासू नागरिकांचा, इच्छुक व्यावसायिकांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठात 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच' उपक्रमाचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. २ : 'नवनिर्मितीक्षम आणि अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज येथे केले. महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग सभागृहात शासनाच्या 'महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम'अंतर्गत एकदिवसीय 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच' उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'कॉर्नेल विद्यापीठाच्या सहकार्याने हाती घेण्यात आलेला 'महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम' फार महत्त्वाचा आहे. त्यामध्ये युवा वर्गाने स्पर्धात्मक पद्धतीने सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या मनातील अभिनव संकल्पना कागदावर उतरवून पुढे त्याचे यशस्वी स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याची ही संधी आहे.'

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्ट-अप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक अजयकुमार पाटील, डॉ. शिवलिंगप्पा सपली, अशोक जॉन, राजकुमार सिंग उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन, विश्वजित खाडे, प्रतीक पवार, अनमोल कोरे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठात 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच' उपक्रमाचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. २ : 'नवनिर्मितीक्षम आणि अभिनव संकल्पनासमृद्ध युवा पिढीची आज देशाला गरज आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज येथे केले. महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग सभागृहात शासनाच्या 'महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम'अंतर्गत एकदिवसीय 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच' उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'कॉर्नेल विद्यापीठाच्या सहकार्याने हाती घेण्यात आलेला 'महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम' फार महत्त्वाचा आहे. त्यामध्ये युवा वर्गाने स्पर्धात्मक पद्धतीने सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या मनातील अभिनव संकल्पना कागदावर उतरवून पुढे त्याचे यशस्वी स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याची ही संधी आहे.'

यावेळी विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्राचे संचालक तथा मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी, विद्यापीठ-उद्योग संवाद कक्ष आदींच्या माध्यमातून स्टार्ट-अप हब निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक अजयकुमार पाटील, डॉ. शिवलिंगप्पा सपली, अशोक जॉन, राजकुमार सिंग उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत दिवसभरात विविध सत्रांत राजकुमार सिंग, अशोक जॉन, विश्वजित खाडे, प्रतीक पवार, अनमोल कोरे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना हेमंत राजोपाध्ये. व्यासपीठावर डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे.

# महर्षी शिंदे प्राच्यविद्येचे पहिले विवेकी अभ्यासक

## हेमंत राजोपाध्ये; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्राच्यविद्येचे पहिले भारतीय विवेकी अभ्यासक होते, असे प्रतिपादन हेमंत राजोपाध्ये यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

हेमंत राजोपाध्ये म्हणाले, महर्षी शिंदे यांनी प्राच्यविद्येच्या अंगाने भारतीय समाजाचे विश्लेषण केले. भारतीय ज्ञान परंपरा व प्राच्यविद्या यांची फेरमांडणी केली. प्राच्यविद्येचा अभ्यास करणारे ते पहिले भारतीय संशोधक होते. भारतीय परंपरा व संस्कृतीचे त्यांना डोळस भान होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी महर्षी शिंदे यांचे न वाचले गेलेले पैलू विद्यार्थ्यांनी वाचायला हवेत, असे सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. अरुण शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना हेमंत राजोपाध्ये. व्यासपीठावर डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे.

# महर्षी शिंदे प्राच्यविद्येचे पहिले विवेकी अभ्यासक

## हेमंत राजोपाध्ये; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्राच्यविद्येचे पहिले भारतीय विवेकी अभ्यासक होते, असे प्रतिपादन हेमंत राजोपाध्ये यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

हेमंत राजोपाध्ये म्हणाले, महर्षी शिंदे यांनी प्राच्यविद्येच्या अंगाने भारतीय समाजाचे विश्लेषण केले. भारतीय ज्ञान परंपरा व प्राच्यविद्या यांची फेरमांडणी केली. प्राच्यविद्येचा अभ्यास करणारे ते पहिले भारतीय संशोधक होते. भारतीय परंपरा व संस्कृतीचे त्यांना डोळस भान होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी महर्षी शिंदे यांचे न वाचले गेलेले पैलू विद्यार्थ्यांनी वाचायला हवेत, असे सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. अरुण शिंदे उपस्थित होते.

0 3 JAN 2024 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे प्राच्यविद्येचे पहिले अभ्यासक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्राच्यविद्येचे पहिले भारतीय विवेकी अभ्यासक होते, असे प्रतिपादन हेमंत राजोपाध्ये यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्यावतीने महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

हेमंत राजोपाध्ये म्हणाले, महर्षी



शिंदे यांनी प्राच्यविद्येच्या अंगाने भारतीय समाजाचे विश्लेषण केले; तसेच भारतीय ज्ञानपरंपरा आणि प्राच्यविद्या यांची फेरमांडणी केली. महाराष्ट्रात आरंभकाळात प्राच्यविद्येचा अभ्यास करणारे ते पहिले भारतीय संशोधक होते. भारतीय परंपरा व संस्कृतीचे त्यांना डोळस भान होते.

डॉ. शिर्के म्हणाले, महर्षी शिंदे यांचे न वाचले गेलेले पैलू विद्यार्थ्यांनी वाचायला हवेत. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. अरुण शिंदे उपस्थित होते.


03 JAN 2024 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे प्राच्यविद्येचे पहिले अभ्यासक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्राच्यविद्येचे पहिले भारतीय विवेकी अभ्यासक होते, असे प्रतिपादन हेमंत राजोपाध्ये यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्यावतीने महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

हेमंत राजोपाध्ये म्हणाले, महर्षी



शिंदे यांनी प्राच्यविद्येच्या अंगाने भारतीय समाजाचे विश्लेषण केले; तसेच भारतीय ज्ञानपरंपरा आणि प्राच्यविद्या यांची फेरमांडणी केली. महाराष्ट्रात आरंभकाळात प्राच्यविद्येचा अभ्यास करणारे ते पहिले भारतीय संशोधक होते. भारतीय परंपरा व संस्कृतीचे त्यांना डोळस भान होते.

डॉ. शिर्के म्हणाले, महर्षी शिंदे यांचे न वाचले गेलेले पैलू विद्यार्थ्यांनी वाचायला हवेत. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. अरुण शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JAN 2024
पुढारी

# हिवाळी सत्रातील ४७९ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तरच्या ४७९ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग आदी ९ अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या. परीक्षेला ४ हजार १३ विद्यार्थी बसले त्यापैकी १४८ विद्यार्थी अनुपस्थित होते.



दरम्यान, दि. २ जानेवारी रोजी एम.ए. (राज्यशास्त्र), एम.टेक., एम.एस्सी. (गणित), जनरल मायक्रोबायलॉजी आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
पुढारी

# हिवाळी सत्रातील ४७९ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तरच्या ४७९ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग आदी ९ अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या. परीक्षेला ४ हजार १३ विद्यार्थी बसले त्यापैकी १४८ विद्यार्थी अनुपस्थित होते.



दरम्यान, दि. २ जानेवारी रोजी एम.ए. (राज्यशास्त्र), एम.टेक., एम.एस्सी. (गणित), जनरल मायक्रोबायलॉजी आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

0 3 JAN 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील सर्वच सुवर्णपदकांवर 'सावित्रीं'चाच ठसा..!

## दहा वर्षातील चित्र : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा वारसा शिवाजी विद्यापीठात दृश्य स्वरूपात : उच्च शिक्षणामध्ये वाढतोय मुलींचा टक्का



प्राथमिकपासून ते उच्च शिक्षणापर्यंत महिलांचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहे. दहावी-बारावीला अव्वल येण्यापासून ते पदवी, पदव्युत्तर शिक्षणात विद्यापीठाचे राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदकही गेल्या १० वर्षात मुलींनीच पटकावले आहे. यातून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी शिक्षणाची नुसती दारेच उघडी केली नाहीत, तर शिक्षण घेण्याचा आत्मविश्वासही त्यांच्यात निर्माण केला. त्यातूनच बहुजनांच्या मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढले आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची बुधवारी, जयंती या पार्श्वभूमीवर क्रांतिज्योतीच्या कार्याचा वारसा दृश्य स्वरूपात शिवाजी विद्यापीठात सावित्रीच्या लेकींनी यशवंत कामगिरीतून जपला आहे.

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

पदवी व पदव्युत्तर, वैद्यकीय, इंजिनिअरिंग, एम.बी.ए. लॉ. यासह सर्वच उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढले आहे. नुसतेच शिक्षण न घेता त्या त्या क्षेत्रात त्या नैपुण्य मिळवत आहेत. राष्ट्रीय पातळीवरील संशोधनात मुलींचे प्रमाण भलेही कमी असेल, पण हळूहळू टक्का वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.

अलीकडेच चांद्रयान तीनचे चंद्रावरील लँडींग यशस्वी करण्यात महिलांचाही सहभाग जगाने पाहिला आहे. त्यामुळे अवकाश संशोधनातही मुली आपला ठसा उमटवत आहेत. शिवाजी विद्यापीठातील एनआयआरच्या जागतिक क्रमवारीतही महिला संशोधकांनी आपले स्थान निर्माण करून ते कायम ठेवले आहे. विद्यापीठात शिक्षण घेऊन परदेशात जाऊन शिक्षण व संशोधनासह करिअर करणाऱ्या मुलींची संख्याही वाढत आहे.

स्पर्धा परीक्षेचा निकाल पाहिला तर मुलांच्याबरोबरीने मुली उत्तीर्ण होत आहेत. त्या देशासह राज्यात अव्वल येत शासकीय नोकरीत वेगळी झलक दाखवत आहेत. शासकीय नोकऱ्यामधील आकडेवारी पाहिल्यास मुलांच्या बरोबरीने मुली असल्याचे चित्र आहे. मुलींचे शिक्षण मोफत आहे, तोपर्यंत पालक निश्चिंत राहतात. परंतू उच्च शिक्षणाबाबत काही पालकांमध्ये उदासिनता दिसते. परतु संख्या कमी आहे. काही मुली मात्र स्वत:च्या जिद्दीवर पार्टटाईम जॉब करून शिक्षणाचा खर्च करताना दिसतात. पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यवसायिक शिक्षणही त्या घेत आहेत.

### क्रांतिज्योतींच्या कार्यावर प्रकाश

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचा वारसा व वसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातून होत आहे. यामध्ये शारदाबाई पवार अध्यासनाद्वारे दरवर्षी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. यंदा ही व्याख्यानमाला कराड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये होणार आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत डॉ. भारती पाटील यांनी इंग्रजीमध्ये पुस्तक लिहून प्रकाशित आहे.

'स्त्री-पुरुष समतेच्या खडतर प्रवासातील क्रांती शलाका सावित्रीबाई फुले' यावर त्यांनी लेखन करून विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले आहे. विविध क्षेत्रात आघाडीवर रहात सावित्रींच्या या लेकींनी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहण्याकडे उचललेले हे पाऊल गौरवास्पद आहे.

### पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|
| २०१९ | २३११२ | २६४०७ |
| २०२० | ३३१६५ | ३३२११ |
| २०२१ | २५९४३ | २६३५७ |
| २०२२ | ५७९६१ | २६९१० |
| २०२३ | २१९६३ | २७४७५ |

### मुलींनी विवेकाचा वापर केला पाहिजे

मुलींच्या शिक्षणात सावित्रीबाई फुले यांनी मुलींना विवेकवादी विचार करायला सांगितला आहे. शिक्षणाबरोबर मुलींनी विवेकाचा वापर केला पाहिजे. क्रांतिज्योतींचा विचार त्यांनी जपला पाहिजे

डॉ. भारती पाटील (शारदाबाई अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ)

### मुलींना परिस्थितीची जाणीव असते

मध्यमवर्गीय समाजातील मुलींना भविष्याची चिंता, परिस्थितीची जाणीव असते. त्यामुळे कष्ट करण्याची तयारी असते. कारण त्या स्वत:चा नाही तर संपूर्ण कुटुंबाचा विचार करतात आणि कष्ट करतात. म्हणूनच सर्वच सुवर्णपदके मुलीच पटकावताना दिसत आहेत.

डॉ. सुजय पाटील (मराठी विभागप्रमुख, कमला कॉलेज)

03 JAN 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील सर्वच सुवर्णपदकांवर 'सावित्रीं'चाच ठसा..!

## दहा वर्षातील चित्र : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा वारसा शिवाजी विद्यापीठात दृश्य स्वरूपात : उच्च शिक्षणामध्ये वाढतोय मुलींचा टक्का



**प्राथमिकपासून ते उच्च शिक्षणापर्यंत महिलांचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहे. दहावी-बारावीला अव्वल येण्यापासून ते पदवी, पदव्युत्तर शिक्षणात विद्यापीठाचे राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदकही गेल्या १० वर्षात मुलींनीच पटकावले आहे. यातून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी शिक्षणाची नुसती दारेच उघडी केली नाहीत, तर शिक्षण घेण्याचा आत्मविश्वासही त्यांच्यात निर्माण केला. त्यातूनच बहुजनांच्या मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढले आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची बुधवारी, जयंती या पार्श्वभूमीवर क्रांतिज्योतीच्या कार्याचा वारसा दृश्य स्वरूपात शिवाजी विद्यापीठात सावित्रीच्या लेकींनी यशवंत कामगिरीतून जपला आहे.**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

पदवी व पदव्युत्तर, वैद्यकीय, इंजिनिअरिंग, एम.बी.ए. लॉ. यासह सर्वच उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढले आहे. नुसतेच शिक्षण न घेता त्या त्या क्षेत्रात त्या नैपुण्य मिळवत आहेत. राष्ट्रीय पातळीवरील संशोधनात मुलींचे प्रमाण भलेही कमी असेल, पण हळूहळू टक्का वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.

अलीकडेच चांद्रयान तीनचे चंद्रावरील लँडींग यशस्वी करण्यात महिलांचाही सहभाग जगाने पाहिला आहे. त्यामुळे अवकाश संशोधनातही मुली आपला ठसा उमटवत आहेत. शिवाजी विद्यापीठातील एनआयआरच्या जागतिक क्रमवारीतही महिला संशोधकांनी आपले स्थान निर्माण करून ते कायम ठेवले आहे. विद्यापीठात शिक्षण घेऊन परदेशात जाऊन शिक्षण व संशोधनासह करिअर करणाऱ्या मुलींची संख्याही वाढत आहे.

स्पर्धा परीक्षेचा निकाल पाहिला तर मुलांच्याबरोबरीने मुली उत्तीर्ण होत आहेत. त्या देशासह राज्यात अव्वल येत शासकीय नोकरीत वेगळी झलक दाखवत आहेत. शासकीय नोकऱ्यामधील आकडेवारी पाहिल्यास मुलांच्या बरोबरीने मुली असल्याचे चित्र आहे. मुलींचे शिक्षण मोफत आहे, तोपर्यंत पालक निश्चिंत राहतात. परंतु उच्च शिक्षणाबाबत काही पालकांमध्ये उदासिनता दिसते. परतु संख्या कमी आहे. काही मुली मात्र स्वत:च्या जिद्दीवर पार्टटाईम जॉब करून शिक्षणाचा खर्च करताना दिसतात. पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यवसायिक शिक्षणही त्या घेत आहेत.

### क्रांतिज्योतींच्या कार्यावर प्रकाश

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचा वारसा व वसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातून होत आहे. यामध्ये ,शारदाबाई पवार अध्यासनाद्वारे दरवर्षी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. यंदा ही व्याख्यानमाला कराड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये होणार आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत डॉ. भारती पाटील यांनी इंग्रजीमध्ये पुस्तक लिहून प्रकाशित आहे.

'स्त्री-पुरुष समतेच्या खडतर प्रवासातील क्रांती शलाका सावित्रीबाई फुले' यावर त्यांनी लेखन करून विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले आहे. विविध क्षेत्रात आघाडीवर रहात सावित्रींच्या या लेकींनी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहण्याकडे उचललेले हे पाऊल गौरवास्पद आहे.

### पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|
| २०१९ | २३११२ | २६४०७ |
| २०२० | २३१६५ | ३३२११ |
| २०२१ | २५९४३ | २६३५७ |
| २०२२ | ५७९६१ | २६९१० |
| २०२३ | २१९६३ | २७४७५ |

### मुलींनी विवेकाचा वापर केला पाहिजे

मुलींच्या शिक्षणात सावित्रीबाई फुले यांनी मुलींना विवेकवादी विचार करायला सांगितला आहे. शिक्षणाबरोबर मुलींनी विवेकाचा वापर केला पाहिजे. क्रांतिज्योतींचा विचार त्यांनी जपला पाहिजे

डॉ. भारती पाटील (शारदाबाई अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ)

### मुलींना परिस्थितीची जाणीव असते

मध्यमवर्गीय समाजातील मुलींना भविष्याची चिंता, परिस्थितीची जाणीव असते. त्यामुळे कष्ट करण्याची तयारी असते. कारण त्या स्वत:चा नाही तर संपूर्ण कुटुंबाचा विचार करतात आणि कष्ट करतात. म्हणूनच सर्वच सुवर्णपदके मुलीच पटकावताना दिसत आहेत.

डॉ. सुजय पाटील (मराठी विभागप्रमुख, कमला कॉलेज)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात उद्या डॉ. दीपक डुबल यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी (दि. ४) सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात डॉ. दीपक डुबल यांचे परदेशातील उच्च शिक्षणातील संधी या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. व्याख्यानाचा लाभ संशोधक, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात उद्या डॉ. दीपक डुबल यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी (दि. ४) सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात डॉ. दीपक डुबल यांचे परदेशातील उच्च शिक्षणातील संधी या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. व्याख्यानाचा लाभ संशोधक, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी केले आहे.

03 JAN 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघाची फुले पुणे विद्यापीठावर मात

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी ठरला पात्र

कोल्हापूर, ता. २ : पात्रता सामन्यात विजय मिळवत शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रवेश केला. तब्बल तीन वर्षानंतर शिवाजी विद्यापीठ संघ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

मुंबईतील एच.एस.एन.सी. विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत आज झालेल्या पात्रता फेरीतील सामन्यात शिवाजी विद्यापीठाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर सहा विरुद्ध शून्य गोलने विजय मिळवला. या विजयासह जालंदर (पंजाब) येथे ५ जानेवारीपासून होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता प्रवेश निश्चित केला. चुरशीच्या झालेल्या सामन्यात २० व्या मिनिटाला शिवाजी विद्यापीठाच्या रोहित पोवारने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका गोलजाळीत विसावला.

पाठोपाठ २५ व्या मिनिटाला कर्णधार प्रथमेश हेरकरने गोल नोंदवून आघाडी दोन विरुद्ध शून्य अशी केली. उत्तरार्धात ३५ व ४० व्या मिनिटाला आदित्य कल्लोळींने तर ४५ व्या मिनिटाला प्रथमेश हेरेकर यांनी गोल नोंदवत सामना पाच विरुद्ध शून्य असा केला. सामन्याच्या ५७ व्या मिनिटाला प्रभू पोवारने गोल नोंदवत शिवाजी विद्यापीठ संघाला एकतर्फी विजय मिळवून दिला.

### पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र झालेला शिवाजी विद्यापीठाचा फुटबॉल संघ.

### विजयी संघ

- स्वयंम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रथमेश हेरेकर, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खोत, यशराज कांबळे, रोहित पोवार, प्रभू पोवार, संकेत जरग, अदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, आविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे. प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड.

03 JAN 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघाची फुले पुणे विद्यापीठावर मात

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी ठरला पात्र

कोल्हापूर, ता. २ : पात्रता सामन्यात विजय मिळवत शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रवेश केला. तब्बल तीन वर्षानंतर शिवाजी विद्यापीठ संघ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

मुंबईतील एच.एस.एन.सी. विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत आज झालेल्या पात्रता फेरीतील सामन्यात शिवाजी विद्यापीठाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर सहा विरुद्ध शून्य गोलने विजय मिळवला. या विजयासह जालंदर (पंजाब) येथे ५ जानेवारीपासून होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता प्रवेश निश्चित केला. चुरशीच्या झालेल्या सामन्यात २० व्या मिनिटाला शिवाजी विद्यापीठाच्या रोहित पोवारने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका गोलजाळीत विसावला.

पाठोपाठ २५ व्या मिनिटाला कर्णधार प्रथमेश हेरेकरने गोल नोंदवून आघाडी दोन विरुद्ध शून्य अशी केली. मध्यंतरापूर्वी ३५ व ४० व्या मिनिटाला आदित्य कल्लोळीने तर ४५ व्या मिनिटाला प्रथमेश हेरेकर यांनी गोल नोंदवत सामना पाच विरुद्ध शून्य असा केला. सामन्याच्या ५७ व्या मिनिटाला प्रभू पोवारने गोल नोंदवत शिवाजी विद्यापीठ संघाला एकतर्फी विजय मिळवून दिला.

### पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र झालेला शिवाजी विद्यापीठाचा फुटबॉल संघ.

### विजयी संघ

- स्वयंम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रथमेश हेरेकर, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खोत, यशराज कांबळे, रोहित पोवार, प्रभू पोवार, संकेत जरग, अदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, आविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे. प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड.

03 JAN 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र



**कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शानदार कामगिरी करत अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मुंबईतील एचएसएनसी विद्यापीठांच्या मैदानात झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शानदार खेळाचे प्रदर्शन केलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाला उपविजेतेपद मिळाले आहे. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाकडून शिवाजी विद्यापीठ संघाला १–० गोलने पराभव स्वीकारावा लागला. मात्र विद्यापीठ संघाने स्पर्धेच्या क्वॉलिफाईंग सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६–० गोलने पराभव केला. याच कामगिरीमुळे विद्यापीठ संघ जालंदर (पंजाब) येथे ५ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेसाठी ए. बी. सी. डी. असे चार गट तयार केले होते. यापैकी शिवाजी विद्यापीठ संघाने बी गटातून स्पर्धेत

■ **पंजाबमध्ये होणार अखिल भारतीयस्तरावरील स्पर्धा**

प्रतिनिधीत्व केले होते. या गटाअंतर्गत झालेल्या बाद फेरीतील पहिल्या सामन्यात विद्यापीठ संघाने राष्ट्रीय रक्षा विद्यापीठावर (गुजरात) ३–१ गोलफरकाने तर दुसऱ्या सामन्यात नागपुरातील रामानंदतीर्थ मराठवाडी विद्यापीठावर २–० गोलने विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यातही शिवाजी विद्यापीठ संघाने पुण्यातील भारती विद्यापीठच्या २–१ गोलफरकाने पराभव करुन क्वालिफाइंग राऊंडमध्ये प्रवेश केला. या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने आक्रमक खेळाच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघावर ६–० गोलने विजय मिळवत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. याचबरोबर पंजाबमध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेचे तिकिट ही काढले. विद्यापीठ संघाला अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र करण्यासाठी कर्णधार प्रथमेश हेरेकर व आदित्य कल्लोळी यांनी प्रत्येकी २ गोल तर रोहित पोवार व प्रभू पोवार यांनीही प्रत्येकी १ गोल नोंदवला.

मंगळवारी झालेल्या उपांत्य सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने पुण्यातील बालाजी विद्यापीठ संघाला ३–० गोलने मात देत स्पर्धेच्या अंतिम फेरीत मुसंडी मारली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठ संघाचा अंतिम सामना झाला. यात मात्र राष्ट्रसंत विद्यापीठ संघाने शिवाजी विद्यापीठ संघावर विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक म्हणून कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अभिजीत वणिरे व व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. शिवराज गायकवाड हे कार्यरत आहेत.

शिवाजी विद्यापीठचा संघ असा : कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयंम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रभू पोवार, संकेत जरग, आदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, अविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे.

03 JAN 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र



कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शानदार कामगिरी करत अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

प्रतिनिधी
कोल्हापूर

मुंबईतील एचएसएनसी विद्यापीठांच्या मैदानात झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शानदार खेळाचे प्रदर्शन केलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाला उपविजेतेपद मिळाले आहे. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाकडून शिवाजी विद्यापीठ संघाला १–० गोलने पराभव स्वीकारावा लागला. मात्र विद्यापीठ संघाने स्पर्धेच्या क्वॉलिफाईंग सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६–० गोलने पराभव केला. याच कामगिरीमुळे विद्यापीठ संघ जालंदर (पंजाब) येथे ५ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेसाठी ए. बी. सी. डी. असे चार गट तयार केले होते. यापैकी शिवाजी विद्यापीठ संघाने बी गटातून स्पर्धेत

■ पंजाबमध्ये होणार अखिल भारतीयस्तरावरील स्पर्धा

प्रतिनिधीत्व केले होते. या गटाअंतर्गत झालेल्या बाद फेरीतील पहिल्या सामन्यात विद्यापीठ संघाने राष्ट्रीय रक्षा विद्यापीठावर (गुजरात) ३–१ गोलफरकाने तर दुसऱ्या सामन्यात नागपुरातील रामानंदतीर्थ मराठवाडी विद्यापीठावर २–० गोलने विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यातही शिवाजी विद्यापीठ संघाने पुण्यातील भारती विद्यापीठच्या २–१ गोलफरकाने पराभव करुन क्वालिफाइंग राऊंडमध्ये प्रवेश केला. या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने आक्रमक खेळाच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघावर ६–० गोलने विजय मिळवत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. याचबरोबर पंजाबमध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेचे तिकिट ही काढले. विद्यापीठ संघाला अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र करण्यासाठी कर्णधार प्रथमेश हेरेकर व आदित्य कल्लोळी यांनी प्रत्येकी २ गोल तर रोहित पोवार व प्रभू पोवार यांनीही प्रत्येकी १ गोल नोंदवला.

मंगळवारी झालेल्या उपांत्य सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने पुण्यातील बालाजी विद्यापीठ संघाला ३–० गोलने मात देत स्पर्धेच्या अंतिम फेरीत मुसंडी मारली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठ संघाचा अंतिम सामना झाला. यात मात्र राष्ट्रसंत विद्यापीठ संघाने शिवाजी विद्यापीठ संघावर विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक म्हणून कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अभिजीत वणिरे व व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. शिवराज गायकवाड हे कार्यरत आहेत.


शिवाजी विद्यापीठचा संघ असा : कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयंम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रभू पोवार, संकेत जरग, आदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, अविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे.

0 3 JAN 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ. भा. आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई येथील 'एचएसएनसी' विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेतील पात्रता सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६ विरुद्ध ० अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव केला. विजयी गोल रोहित पोवार, प्रथमेश हेरेकर, अदित्य कल्लोळी, प्रभू पोवार यांनी गोल केले.



**कोल्हापूर : जालंदर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड.**

शिवाजी विद्यापीठ संघाची निवड दि. ५ जानेवारीपासून जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी झाली आहे. या संघात कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खोत, यशराज कांबळे, रोहित पोवार, प्रभू पोवार, संकेत जरग, अदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, अविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे यांचा समावेश आहे, तर प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड हे जबाबदारी सांभाळणार आहेत.

0 3 JAN 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ. भा. आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई येथील 'एचएसएनसी' विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेतील पात्रता सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६ विरुद्ध ० अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव केला. विजयी गोल रोहित पोवार, प्रथमेश हेरेकर, अदित्य कल्लोळी, प्रभू पोवार यांनी गोल केले.



**कोल्हापूर : जालंदर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड.**

शिवाजी विद्यापीठ संघाची निवड दि. ५ जानेवारीपासून जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी झाली आहे. या संघात कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खोत, यशराज कांबळे, रोहित पोवार, प्रभू पोवार, संकेत जरग, अदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, अविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे यांचा समावेश आहे, तर प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड हे जबाबदारी सांभाळणार आहेत.